डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशाधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा. क्र./बार्टी/योजना विभाग/ CET २०२६ /२०२६-२७/ ४६९३ दि. १०/०८/२०२६

# स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सामयिक प्रवेश परीक्षा (CET-२०२६)

सामयिक प्रवेश परीक्षा (CET २०२६) बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना तसेच विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. बार्टी मार्फत सन २०२६ करिता राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण बाबतची जाहिरात दिनांक ०७/०८/२०२६ रोजी बार्टीच्या संकेतस्थळावर तसेच विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत. सन २०२६ करीता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (CET २०२६) पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सामयिक प्रवेश परीक्षा (CET २०२६) ऑनलाईन अर्ज भरण्यासाठीची अधिकृत लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी सर्वांनी https://barticet2026.cbtexam.in या लिंकचा वापर करून आपला अर्ज विहित वेळेत सादर करावयाचा आहे. तसेच त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे सोबत जोडण्यात येत आहेत.

**स्वाक्षरी/-**
**(दीपा मुधोळ-मुंडे)**
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

सत्यमेव जयते

**सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने सन २०२६ - २७ करीता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या सामायिक चाळणी परीक्षा २०२६-२७ (CET) बाबत सूचना.**

सन २०२६-२७ करीता महाराष्ट्र राज्यातील टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेकरीता लाभार्थी निवडीकरीता सामायिक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात येणार आहे. याकरीता उपरोक्त नमूद संस्थाच्या लक्षित गटातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेच्या लाभासाठी खालील सूचना देण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये आवश्यक शैक्षणिक पात्रता, संबंधित आवश्यक कागदपत्रे आणि सामायिक प्रवेश परीक्षा (CET) साठी अर्ज करतांना घ्यावयाची काळजी इ. माहिती देण्यात आली आहे.

**अ) उमेदवारांना योजनेच्या लाभासाठी सादर करावयाच्या अर्जाबाबतच्या सूचना –**

१. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी अर्ज भरण्याकरीताच्या सर्व सूचना पूर्ण वाचून अर्ज सादर करावा. Application form बाबतच्या सर्व सूचना पूर्ण न वाचता अर्ज सादर केला आणि त्यात काही अडचणी/ त्रुटी उद्भवल्यास उमेदवारास पुन्हा अर्ज सादर करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. एका वेळेस उमेदवार एकाच योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करू शकतो. उमेदवारास एकापेक्षा अधिक योजनेकरीता अर्ज करावयाच्या असल्यास Registration अंती उमेदवारास प्राप्त झालेल्या Login ID व Password चा वापर करून Dashboard पानावरील Apply for new scheme या Tab वर क्लिक करून इतर योजनांकरीता (संबंधित योजनेच्या पात्रतेनुसार) अर्ज भरता येईल. तथापि, याकरिता उमेदवाराने योजनानिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय व अर्जात नमूद केल्यानुसार इतर पात्रता आणि अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

३. उमेदवारांनी Online Application Form भरल्यानंतर सदर Form download करण्यासाठी ज्या दिवसापर्यंत मुदत दिली आहे त्या दिवसापर्यंतच Application Form प्रिंट करून घ्यावा. तद्नंतर उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत कार्यालयाकडून Application Form मिळू शकणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन परीक्षेसाठी जे जिल्हे निवडले असतील व प्रथम प्राधान्य तत्वानुसार जे जिल्हे व परीक्षा केंद्र उमेदवारास प्राप्त झाले असेल तिथेच त्यांना परीक्षेसाठी उपस्थित राहावे लागेल. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविल्या व्यतिरिक्त कोणतेही परीक्षा केंद्र / जिल्हा रद्द करण्याचा किंवा अपरिहार्य परिस्थितीत उमेदवाराला उपलब्ध क्षमता व रिक्त जागा नुसार कोणतेही परीक्षा केंद्र वाटप करण्याचा अधिकार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अंमलबजावणी व सनियंत्रण समिती यांनी राखून ठेवला आहे.

६. फक्त केंद्रीय लोकसेवा आयोग- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाच्या सामायिक चाळणी परीक्षेकरीता दिल्ली येथे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उर्वरित सर्व ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. ज्या उमेदवारांना एका पेक्षा जास्त प्रशिक्षणासाठी अर्ज करावयाचा आहे अशा उमेदवारांनी याबाबत स्वतःच्या जबाबदारीने परीक्षा केंद्र निवडावीत. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा केंद्र बदलून देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या प्रशिक्षण योजनांचा लाभ घेता येणार नाही. खोटी माहिती सादर केल्यास किंवा माहिती लपविल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याबद्दल उमेदवाराचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवारावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांना पुढे भविष्यात कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. उमेदवारांनी अर्ज भरतांना User ID व मिळालेला Password व्यवस्थित सांभाळून ठेवणे. User ID व Password विसरल्यास पुन्हा उपलब्ध करून दिला जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

९. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा. त्यामध्ये स्वतःचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक अचूक भरावा.

१०. उमेदवाराने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल व पुढे भविष्यात कोणत्याही योजनेस पात्र राहणार नाही.

११. उमेदवाराने सामायिक चाळणी परीक्षेबाबतचे परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card/ Hall Ticket) तसेच परीक्षेबाबत असलेल्या सूचनांची माहिती संबंधित संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच डाउनलोड करावे.

१२. सामायिक चाळणी परीक्षाबाबतचे (CET) वेळापत्रक आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अधिकृत https://trti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य आहे.

१३. उमेदवारांनी एका पेक्षा जास्त योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केल्यास प्रसिद्ध वेळापत्रकानुसार ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर विहित वेळेत उपस्थित राहण्याची सर्व जबाबदारी उमेदवारांची राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे परीक्षा केंद्र व परीक्षेच्या निर्धारित वेळेत बदल करण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

१४. सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (CET) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतेवेळी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तरी उमेदवारांनी कोणतीही चुकीची किंवा खोटी कागदपत्रे अपलोड करू नयेत. तथापि, सामायिक चाळणी परीक्षेतून निवड झाल्यानंतर मूळ कागदपत्रांची पडताळणी करून सामायिक चाळणी परीक्षेच्या गुणवत्तेच्या आधारावर अंतिम निवड करण्यात येईल. सामायिक चाळणी परीक्षा उत्तीर्ण होऊन निवड झाली तरी निवड अंतिम ग्राह्य धरण्यात येणार नाही. उमेदवाराने कागदपत्रे तपासणी दरम्यान नमूद केलेली विहित मूळ कागदपत्रे सादर न केल्यास निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५. निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार सामायिक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यात येणार असल्याने सर्व योजनांची परीक्षा संपल्यावरच सर्व संबंधित योजनांच्या सामायिक प्रवेश परीक्षांची गुणवत्ता यादी प्रत्येक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत केवळ संस्थेच्या संकेतस्थळांवरच सूचना प्रसिद्ध केल्या जातील. वैयक्तिक स्वरूपात कोणत्याही उमेदवारांना कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवारांनी याबाबत कार्यालयात दूरध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा करू नये तसेच कार्यालयातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधू नये.

१६. सदर योजनेची सामायिक चाळणी परीक्षा (CET) उत्तीर्ण होऊन, मूळ कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर उमेदवाराने निवड केलेल्या संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेशित झाल्यानंतर नियमानुसार शासनाने निश्चित केलेल्या कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान उमेदवारास इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडता येणार नाही.

१७. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. ३० ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार दि. ०१ जुलै, २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार काठिण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (वर्ग ४ < वर्ग ३ < वर्ग २ < वर्ग १) घेण्यात येणाऱ्या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांने पूर्वी तुलनेने कमी काठिण्य पातळी पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असला तरी संबंधित विद्यार्थ्यांस चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुनःश्च केवळ एकदाच लाभ घेता येईल. अशाप्रकारे एक विद्यार्थी / उमेदवार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त दोनदा लाभ घेण्यास पात्र राहील. यानुसार उमेदवारांनी यापूर्वी दोन योजनांचा लाभ घेतला असल्यास संबधित उमेदवार सदरच्या पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता अपात्र राहील.

१८. सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या लाभाकरीता सर्वच उमेदवारांसाठी उक्त संस्थांच्या संस्था प्रमुखांनी एकमताने कमाल वयोमर्यादा ३० वर्ष ठरविली आहे.

१९. टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापर्यंत असणे बंधनकारक आहे. उमेदवारांचे उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त असल्यास उमेदवारास सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच याबाबत तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

२०. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय) करीताच्या योजनांकरीता ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्राकरीता अर्ज केला आहे परंतु त्यांना अद्याप जमात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही, ते अर्जाच्या पोच पावतीचा वापर करून अर्ज सादर करू शकतात. तथापि अशा उमेदवाराची संबंधित योजनेकरीता लाभार्थी म्हणून निवड झाल्यास मूळ कागदपत्रे पडताळणी (Document Verification) च्या वेळी त्या उमेदवाराने अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२१. सामायिक चाळणी परीक्षेतून निवड झाल्यावर उमेदवारांनी मूळ कागदपत्रे संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचनेतील निर्धारित कालावधीत तपासून घेणे अनिवार्य आहे. दिलेल्या निर्धारित कालावधीत जर उमेदवाराने आपले कागदपत्रे तपासून घेतली नाहीत किंवा संबंधित संस्थेच्या कार्यालयाशी याबाबत कोणताही संपर्क साधला नाहीत तर उमेदवाराचा प्रवेश आपोआप रद्द होईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२२. सर्व पूर्व प्रशिक्षण योजनांकरीता नियमानुसार महिला, दिव्यांग व अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतू आरक्षित जागेवर महिला, दिव्यांग व अनाथ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा उमेदवारांच्या गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

२३. सामायिक चाळणी परीक्षा, परीक्षा प्रवेश पत्र, गुणवत्ता यादी / प्रतिक्षा यादी, कागदपत्रे पडताळणी तसेच इतर प्रक्रिया या बाबतची सर्व अद्यावत माहिती प्रत्येक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल. याबाबतची कोणतीही माहिती कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक स्वरुपात / लेखी पत्रव्यवहार व्दारे कळविण्यात येणार नाही.

२४. सामायिक चाळणी परीक्षा तसेच निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत व आर्टी या संस्थांच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम त्या त्या संस्थेच्या नियम व निकषानुसार राबवतील. तसेच याबाबतचे सर्व नियम उमेदवारांना बंधनकारक असतील.

२५. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान उमेदवारास कुठेही शासकीय / निमशासकीय नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत काही तक्रार प्राप्त झाल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## ब) विविध योजनानिहाय शैक्षणिक अर्हता –

| अनु. क्र. | पूर्व प्रशिक्षण योजनेचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | युपीएससी - नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण (दिल्ली व महाराष्ट्र) | कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण |
| २ | एमपीएससी-राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण |
| ३ | एमपीएससी-अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी किंवा खाली नमूद समतुल्य अभ्यासक्रमाची पदवी -<br>▪ B.E./B. Tech (Civil & Water Management Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Civil & Environmental Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Structural Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Construction Engineering)<br>------------------------------------------------<br>२. मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी किंवा खाली नमूद समतुल्य अभ्यासक्रमाची पदवी -<br>▪ B.E./B. Tech (Automobile Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Production Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Industrial Engineering)<br>------------------------------------------------<br>३. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी किंवा खाली नमूद समतुल्य अभ्यासक्रमाची पदवी -<br>▪ B.E./B. Tech (Electrical & Power Engineering) |

| अनु. क्र. | पूर्व प्रशिक्षण योजनेचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| | | ▪ B.E./B. Tech (Electronics & Power Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Power System Engineering)<br>▪ B.E./B. Tech (Electrical & Electronics Engineering)<br>-----------------------------------------------<br>४. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी पदवी किंवा अभ्यासक्रमाशी समतुल्य पदवी. |
| ४ | एमपीएससी-विधी / न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | विधी शाखेची पदवी उत्तीर्ण व विहित दिनांकास अनुभव-<br>1. Must have practiced as an Advocate in the High Court of Bombay or Courts subordinate thereto for not less than  years on **08th Aug, 2026** and while computing the period for practicing as an Advocate, the period during which the candidate has worked as a Law Clerk (after provisional enrolment or registration as an Advocate) with any of the Judges of the High Court of Bombay or Judicial Officers of the Courts subordinate to the High Court of Bombay shall be included.<br>2. Practice as an Advocate shall be reckoned from the date of provisional enrollment or registration as an Advocate with the State Bar Council; or<br>3. Must be working or must have worked as Public Prosecutor or Government Advocate for not less than 3 years in the post or posts as on **08th Aug, 2026**. In computing the period of three years, the period during which the candidate has worked as an Advocate shall also be included. |
| ५ | एमपीएससी - गट ब व गट क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण |
| ६ | एसएससी - वर्ग ३ पदांकरीता परीक्षा पूर्व प्रशिक्षण | कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण |
| ७ | बँक (IBPS), रेल्वे, नाबार्ड, एलआयसी इ. व तत्सम परीक्षा पूर्व प्रशिक्षण | कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण |
| ८ | महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पूर्व प्रशिक्षण | डी.एड किंवा बी.एड उत्तीर्ण |
| ९ | पोलीस व मिलिटरी भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पोलीस भरती करीता - किमान इयत्ता १२ वी उत्तीर्ण<br>सैन्य भरती करीता - किमान इयत्ता १० वी उत्तीर्ण |

**क) ऑनलाईन अर्ज सादर करताना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी –**

१. महाराष्ट्राचे अधिवास / रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate)
२. जात / जमातीचे प्रमाणपत्र (केवळ टीआरटीआय, बार्टी, सारथी व आर्टी करीता)
३. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) किंवा वैधता प्रमाणपत्राकरीता अर्ज केला असेल तर अर्जाची पोच पावती. (केवळ टीआरटीआय करीता)
४. १० वी गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र
५. १२ वी गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र (Passing Certificate)
६. पदवी गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र (Passing Certificate)
७. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला रु.८.०० लाख पेक्षा कमी असलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला (आर्थिक वर्ष सन २०२५-२६ चा)
८. दिव्यांगत्वाचा दाखला (लागू असल्यास)
शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) असावे.
९. अनाथ असल्याचा दाखला (लागू असल्यास)
(उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला दाखला असावा.)
१०. नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (सारथी संस्थेकरीता)
११. अमृत संस्थेकरीता शाळा सोडल्याचा दाखला (LC) / ट्रान्सफर सर्टिफिकेट (TC) ज्यामध्ये जात नमूद असेल, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र (EWS Certificate)

---

**उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या हेल्पलाईन क्रमांक व ई-मेल आयडी वरच संपर्क साधावा. तसेच उपरोक्त सर्व सूचना व माहिती वाचून ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

**तांत्रिक मदतीकरीता (For Technical Support) संस्थानिहाय हेल्प डेस्कचे दूरध्वनी क्र. व ईमेल आयडी –**

| अनु. क्र | संस्थेचे नाव | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे | ०२२-६५४७५००१ | trticet2026helpdesk@gmail.com |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे | ०२२-६५४७५००३ | barticet2026helpdesk@gmail.com |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे | ०२२-६५४७५००७ | sarthicet2026helpdesk@gmail.com |

| अनु. क्र | संस्थेचे नाव | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| ४ | महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे | ०२२-६५४७५००९ | amrutcet2026helpdesk@gmail.com |
| ५ | अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई | ०२२-६५४७५००५ | articet2026helpdesk@gmail.com |

**इतर माहितीकरीता (For Non-Technical Support) संस्थानिहाय हेल्प डेस्कचे दूरध्वनी क्र.—**

| अनु. क्र | संस्थेचे नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे | ०२०-२६३३०८५४ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे | ०२०-२६३३३३३०<br>०२०-२६३३३३३९<br>०२०-२६३४३६०० |
| ३ | छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे | ०२०-२५५९२५२०<br>०२०-२५५९२५५० |
| ४ | महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे | ०२०-२९९९९०९६ |
| ५ | अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई | ०२२-४४५१५८५४<br>०२०-२५५००१९४<br>०२०-२५५००१९५ |

*************************************************************************

**सर्व उमेदवारांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा..!**